
A.B.M.S.Parishad's
Shri Shahu Mandir Mahavidyalaya,Parvati Pune 411009
(Maharashtra, India).
(NAAC Re-accrediated 'A' Grade) (CGPA - 3.10)



**An International Refereed Registered Research Journal**

Impact Factor : (2018) - 4.67 : SJIF | ISSN - 2320 - 5881 (Print) | Volume - IX September, 2018

# Rajarshi



**Chief Editor :** **Prin. Dr. Shobha Ingawale**
Email : principal_ssmmpune@yahoo.com

**Executive Editor : Prof. Dr. D. S. Borkar**
Email : borkards.72@rediffmail.com

**Email :** rajarshrijornal@shahucollegepune.org | **Website :** www.shahucollegepune.org

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. नं. | लेखाचे शिर्षक | लेखकाचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| १. | शैक्षणिक प्रक्रियेत मूल्य शिक्षणाची आवश्यकता | डॉ. शोभा इंगवले | १३३-१३७ |
| २. | स्त्री सक्षमीकरणाचे पुरस्कर्ते माननीय शरद पवार | डॉ. पौर्णिमा शिरिष कोल्हे<br>डॉ. पांडुरंग भोसले | १३८-१४० |
| ३. | पंडिता रमाबाई यांचे स्त्रीमुक्तीविषयक कार्य | डॉ. महालक्ष्मी मोराळे | १४१-१४३ |
| ४. | हिंदी सिनेमा में हिंदी गीतों का योगदान | डॉ. मीना ठाकूर | १४४-१४७ |
| ५. | गोंधळ, भजन व कीर्तन : स्वरूप विवेचन | डॉ. शिवलिंग मेनकुदळे | १४८-१५३ |
| ६. | वासुदेवाची गीते व कलाविष्कार | डॉ. सुभाष आहेर | १५४-१६७ |
| ७. | लोकसाहित्यातील लोकजीवन व लोकसमजुती | डॉ. बाबासाहेब शेंडगे | १६८-१७२ |
| ८. | 'विनोबा भावे एक आदर्श राष्ट्रसंत' | डॉ. कालिदास दिनकर फड | १७३-१७६ |





Scanned by CamScanner

# वासुदेवाची गीते व कलाविष्कार



– डॉ. सुभाष आहेर
रयत शिक्षण संस्था राधाबाई काळे महिला महाविद्यालय,
अहमदनगर

## १.१प्रास्ताविक

मराठी लोकजीवनात आणि लोकसंस्कृतीत प्राचीन काळापासून वासुदेवाला एक आगळे-वेगळे स्थान आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत अस्तित्वात असलेली वासुदेव ही संस्था लोकगायकांच्या परंपरेशी नाते सांगणारी आहे. लोकांना गीताच्या माध्यमातून कृष्णकथा, आध्यात्मिक गोष्टी, सामाजिक आशयपर नीतिबोधाची माहिती सांगून आपला उदरनिर्वाह करणारी ही संस्था लोकजीवनात लोकांच्या जिव्हाळ्याची होती. वासुदेवांशी कौटुंबिक संवाद साधला जात होता. त्याच्याजवळ आपल्या सुख-दुःखाचा निरोप, आपली खुशाली जवळच्या नातेवाईकांसाठी दिली जात होती. या दृष्टीने लोकसंपर्काचे, लोकसंवादाचे माध्यम म्हणूनही वासुदेवाचे हे जिव्हाळ्याचे कार्य कौटुंबिकदृष्ट्या मोलाचे होते.

## १.२वासुदेव – परंपरा

वासुदेवाची परंपरा फार प्राचीन असून त्यांनी कृष्णभक्तीची परंपरा लोकजीवनात प्रवाहित ठेवली. वासुदेव श्रीकृष्णाचा परमभक्त असून आपल्या उदरनिर्वाहासाठी दारोदार भिक्षा मागत श्रीकृष्णाची गाणी तो गातो. सामान्यतः उपदेशपर व आध्यात्मिक विषयावरील गीते तो म्हणतो.

महाराष्ट्राची लोकरंगभूमी गाजविणारा एक उपासक म्हणून वासुदेवाचा उल्लेख केला जातो. वासुदेवाने दान स्वीकारल्यानंतर आपल्या वाडवडिलांचे नाव घेतले की त्यांचा उद्धार होतो, अशी भाबडी लोकश्रद्धा आहे.

वासुदेवाच्या कुळारंभाचा शोध श्रीकृष्णापर्यंत जातो. वासुदेव हा कृष्णसखा आहे. श्रीकृष्णाशी असलेल्या जवळिकीची निदर्शक म्हणून त्याने आपल्या मस्तकी मोरपिसांची शंकाकृती टोपी धारण केलेली असते. एका ब्राह्मण ज्योतिषाला कुणबी स्त्रीपासून झालेला सहदेव हा आपला पूर्वज असल्याचे वासुदेव सांगतात.

''छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात वासुदेव समाजाने व्यावसायिक कौशल्याच्या वा हेरगिरीच्या कामासाठी मदत केला. त्यामुळे महाराजांना शत्रूंची अनेक गुपिते समजत होती.''[१] याचा अर्थ वासुदेवाची परंपरा शिवकाळातही होती.

वाडवडिलांचा उद्धार फक्त वासुदेवाच्याच हस्ते करावा. उद्धारण्यास वासुदेवच उपयोगी असतो, हे पटविण्यासाठी वासुदेव म्हणतात,


ISSN - 2320-5881



''वाहण्यास गंगा, पिंडीस ब्राह्मण
सुतकास न्हावी, उद्धारण्यास वासुदेव''[२]

## १.३रंगभूषा – वेशभूषा – वाद्य, संगीत – जीवनपद्धती

वासुदेव पारंपरिक पोशाखात वावरतो. अंगात घोळदार अंगरखा किंवा झगा, धोतर किंवा सलवार, उपरणे, डोक्यावर मोरपिसांची शंकूच्या आकाराची टोपी, काखेत झोळी (विशेषतः लाल रंगाची), पायात घुंगराचे चाळ, कमरेला बांधलेला शेला त्यात खोचलेली बासरी किंवा मुरली, गळ्यातून पुढे दोन्हीकडे सोडलेला शेला, एका हातात टाळ, दुसऱ्या हातात चिपळ्या, कपाळाला गंध, गळ्यात कवड्याच्या, रुद्राक्षाच्या किंवा तुळशीच्या माळा, गळदावण (दोरी) केशरी रंगाचा ध्वज अशा वेशभूषेत वासुदेव दारासमोर, अंगणात किंवा रस्त्यावर देवतांचा नामघोष करीत. एका हाताने टाळ वाजवीत गाणी म्हणतो.

वासुदेव पहाटे ५-६ वाजता भिक्षा मागायला सुरुवात करतात. दररोजची मिळकत ५०-६० रूपये. वासुदेवांची भिक्षा मागण्याची गावे ठरलेली असतात. पण आता वासुदेवाची संख्या कमी झाल्यामुळे कोणी कोणत्याही गावी भिक्षा मागतो. हा व्यवसाय सर्वच वासुदेव घराण्यात पिढीजात असतो. लोक वासुदेवाकडे भिकारी म्हणून बघत नाहीत. त्याला भिक्षा वाढणे हे धर्मकर्तव्य मानले जाते. त्यात तुच्छतेचा, अवहेलनाचा भाव नसतो.

खेड्यापाड्यांतील यात्रा-जत्रांत वासुदेवाची उपस्थिती असते. वासुदेव तीर्थक्षेत्री नदीच्या काठाने फिरतात. कारण नदीच्या पात्रात उभे राहून वासुदेवास दान करणे पुण्यकर्म समजले जाते. वासुदेव दान मिळाल्यावर वाड-वडिलांचा उद्धार करतात. यात्रा-जत्रा नसल्या म्हणजे हे लोक गावोगावी, घरोघरी फिरून श्रीकृष्णचरित्र गीतातून गाऊन भिक्षा मागतात. वासुदेव घरी येणे भाग्याचे मानले जाते. त्याचे कौतुक करून कपडे, धान्य व पैसे दिले जातात.

वतनाच्या गावी भिक्षा मागताना वासुदेव डोक्यावर मोरपिसांची टोपी घालतो. इतर गावी भिक्षा मागताना तो मोरपिसांची टोपी घालत नाही. पण आज वतनाची गावे राहिली नाहीत. लोकांचाही वासुदेवाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. त्यामुळे वासुदेवाला पारंपरिक जीवनपद्धतीने उदरनिर्वाह करणे कठीण होत आहे. असे असले तरी वासुदेव ही संस्था आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसते. सध्या वासुदेवांची नवी पिढी शिक्षण घेऊन पुरोगामी विचारांची बनत आहे. त्यामुळे पारंपरिक वासुदेवपण स्वीकारण्याकडे त्यांचा कल नाही.

वासुदेव समाजात पंढरपूर व येरमाळ्याची यात्रा केली जाते. या यात्रा न केल्यास प्रपंचात बरकत येणार नाही, अशी त्यांची समजूत असते. पूर्वी जातीच्या रिवाजाप्रमाणे हक्काची म्हणजे वतनाची गावे मागावीच लागत. टाळाटाळ केल्यास जातीत कमी समजतात.

## १.४कलेची संहिता–आकृतिबंध–कलेचे सादरीकरण–नाट्यवासुदेव

हा मराठी लोकसंस्कृतीतील सात्त्विक भूमिका करणारा एक लोककलावंत आहे. पहाटेच्या वेळी तो गावात येतो. लोकांना जागे करतो. दान पावलं, दान पावलं हे पालुपद आळवीत, टाळ चिपळ्याच्या तालात व पायातील घुंगराच्या नादात मंद पावले टाकत तो गाणी म्हणतो. दान झोळीत पडताच वासुदेव दात्याला वाडवडिलांचे नाव विचारतो आणि


ISSN - 2320-5881

Scanned by CamScanner